MHST200005402024

## नि.दि.दा.क्र.१८४/२०२४ मधील निशाणी क्र.५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दाव्याचा अंतीम निकाल लागेपावेतो प्रतिवादी यांनी दावा मिळकतीतील वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस स्वत: अगर अन्य कोणामार्फत हरकत अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद मिळणेकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ नुसार दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे नि.क्रं.२४ याचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. वादातीत कथने, सादर करण्यात आलेला युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरुन माझे विचारार्थ खालील वादमुद्दे निष्पन्न झाले. त्यांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवत आहेः

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादींचे वतीने सकृतदर्शनी प्रकरण आहे का ? | नकारार्थी |
| २) | सोयीचा समतोल वादींच्या वतीने आहे का ? | नकारार्थी |
| ३) | प्रस्तुतचा अर्ज नामंजुर झाल्यास वादींचे कशानेही न भरुन येणारे अपरिमीत असे नुकसान होणार आहे का ? | नकारार्थी |
| ४) | आदेश काय ? | अर्ज नामंजुर करण्यात येतो. |

### कारणमिमांसा

४. वादींचे असे कथन आहे की, मौजे पांडेवाडी, ता.वाई येथील गट नं.२८७, क्षेत्र १ हे. २५ आर, पो.ख.३ आर, आकार ३ रुपये ५६ पैसे ही मिळकत

त्यांची मालकी हक्काची व खुद्द वहिवाटीची आहे. प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी काहीही संबंध नव्हता व नाही. दावा मिळकतीमधुन प्रतिवादी यांना त्यांचे मिळकतीत अगर अन्य कोठेही जाण्यासाठी रस्ता अस्तीत्वात नव्हता. प्रतिवादी यांना सदरची वस्तुस्थिती माहिती असतानाही त्यांनी तहसिलदार, वाई यांचेकडे मामलेदार कोर्ट ॲक्टचे कलम ५ अन्वये एस.आर. क्रं.१२/२०२१ दाखल केला. तहसिलदार यांनी सदर अर्ज दि.१४.०९.२०२२ रोजी मंजुर करुन सामनेवाला यांनी गट नं.२८७ मधील हनुमानवाडी ते कोळीवाडीकडे जाणारा रस्ता पुर्ववत करण्यात यावा व सदर रस्त्याने कोणत्याही शेतकऱ्यास जाणे-येणेसाठी आणि वाहने ने-आण करण्यास हरकत अडथळा करु नये असा आदेश पारीत केला. वादी यांनी सदर निर्णयाविरुद्ध उपविभागीय अधिकारी, वाई यांचेकडे रिव्हीजन अपील नं.०७/२०२३ दाखल केले होते व सदरचे अपील फेटाळण्यात आले. तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांनी चुकीचे निर्णय दिले व सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता मंडल अधिकारी, धोम यांनी वादींना नोटीस पाठवली. तहसिलदार यांनी सदर रस्ता केस मंजुर करतेवेळी मामलेदार कोर्ट ॲक्टमधील कोणत्याही तरतुदीचे पालन केले नसल्याने सदरचा आदेश बेकायदेशीर आहे.

५. वादींचे पुढे असेही कथन आहे की, तहसिलदार यांच्या निर्णयामधील कोळेकरवाडी ते हनुमानवाडी असा असणारा रस्ता किती किलोमीटर लांबीचा आहे व त्याची रुंदी किती आहे याचा कसलाही उल्लेख निकालपत्रात नाही. गट नं.२८७ मधुन रस्ता जातो असे म्हणत असताना मौजे वरखडवाडी, मौजे पांडेवाडी, मौजे भोगाव या गावातील कोणकोणत्या गट नंबरमधुन सदर रस्ता जातो याचाही उल्लेख तहसिलदार यांचे निर्णयात नाही. तसेच तहसिलदार यांचे कोर्टात प्रतिवादी यांचेपैकी पांडुरंग बाळा सकपाळ व बबन नारायण कांबळे यांच्या मुळ अर्जावर सहया नाहीत. उत्तम सिताराम इथापे हे अर्ज दाखल करण्यापुर्वी मयत होते. दावा मिळकतीच्या पुर्व बाजुला आणि गट नं.२३९, २३६, २३४, २३१ व २३२ या मिळकतीचे पश्चिम बाजुला पुर्वंपारचे रस्ते आहेत. सदर रस्त्याचा वापर प्रतिवादी करीत होते व आहेत. प्रतिवादी यांनी तहसिलदार यांचेकडील अर्जात गट नं.२३० या गटाचा उल्लेख केला असुन तो वादी

यांचा असल्याचेही कथन केले आहे. परंतु, गट नं.२३० या मिळकतीशी वादी यांचा काहीही संबंध नाही.

६. वादींचे पुढे असेही कथन आहे की, तहसिलदार यांनी केलेला स्थळपाहणी पंचनामा हा बेकायदेशीर आहे. तसेच त्यावर स्वतंत्र पंचांच्या सहया नाहीत. दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर रस्त्याचा उल्लेख नाही. तसेच उपविभागीय अधिकारी, वाई यांनी कायदेशीर प्रक्रिया न पाहता घाईगडबडीने तहसिलदार, वाई यांचा निर्णय कायम ठेवलेला आहे. दि.१५.०८.२०२४ रोजी वादी हे गावातील झेंडा वंदनानंतर त्यांच्या शेतात गेले असता तेथे बरेच प्रतिवादी गोळा झाले होते. तसेच सदर प्रतिवादी आजच आपण इथे रस्ता करुया अशी भाषा वापरु लागले. वादीने त्यांना समजावुन सांगितले असता आम्ही जबरदस्तीने रस्ता करु असे म्हणुन ते वादीच्या अंगावर धावुन आले. सकृतदर्शनी प्रकरण वादींच्या बाजुने असुन सोयीचा समतोल हा वादींच्या बाजुने आहे. तसेच प्रतिवादींना पर्यायी रस्ता उपलब्ध असल्याने सदरचा अर्ज मंजुर केल्यास त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदरचा अर्ज नामंजुर केल्यास वादींचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

७. प्रतिवादी क्रं.१ ते ६, ८ ते १२, १४ ते १८, २० ते २३ व २५ यांना दाव्याचे समन्सची बजावणी झाली. त्यापैकी प्रतिवादी क्रं.१ हा हजर झाला. परंतु, त्याने त्याची कैफियत व म्हणणे दाखल केले नाही. उर्वरीत प्रतिवादी दाव्यात हजर झाले नाहीत. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रं.१ याचेविरुद्ध विना म्हणणे आणि प्रतिवादी क्रं.२ ते ६, ८ ते १२, १४ ते १८, २० ते २३ व २५ यांचेविरुद्ध एकतर्फा चालविणेत आला.

८. प्रतिवादी क्रं.७, १९ व २४ यांचे समन्स दि.१०.०२.२०२५ रोजी न बजावता परत आले. परंतु, वादीने सदर प्रतिवादींविरुद्ध समन्स बजावणीची आजअखेर कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे, प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्रं.७, १९ व २४ यांचेविरुद्ध दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ९ नियम ५ अन्वये खारीज करण्यात आला.

९. प्रतिवादी क्रं.२६ ते २८ यांनी त्यांचे म्हणणे नि.क्रं.२४ वर दाखल करुन त्यांनी वादींच्या तुर्तातुर्त ताकीद अर्जातील संपुर्ण कथने नाकारलेली आहेत. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, दि.१४.०९.२०२२ रोजीचा तहसिलदार, वाई व दि.२५.०७.२०२४ रोजीचा उपविभागीय अधिकारी, वाई यांचे आदेश कायदेशीर आहेत. सदर आदेशाविरुद्ध वादींनी सक्षम वरिष्ठ महसुली न्यायालयात अपील अथवा रिव्हीजन दाखल करणे आवश्यक होते. सदर प्रतिवादींनी कायदयातील तरतुदींचा विचार करुनच आदेश पारीत केलेले आहेत. दि.२१.०९.२०२१ रोजी पंचांसमक्ष प्रत्यक्ष स्थळपाहणी करण्यात आली होती. त्यावेळी पुर्वी अस्तीत्वात असलेल्या रस्त्यात वादींच्या हद्दीमध्ये खोदकाम केल्याचे आणि त्याच्या मागेपुढे सुमारे १० ते १२ फुट रुंदीचा रस्ता असल्याचे दिसुन आले. वादींनी त्यांच्या हद्दीमध्ये रस्ता कोरलेला असुन केवळ ३ फुटाचा रस्ता ठेवल्याचे स्थळपाहणी दरम्यान दिसुन आले. वादींनी त्यांच्या हद्दीमध्ये १० ते १२ फुट रुंदीचा रस्ता ठेवणे आवश्यक आहे. वादींच्या बाजुने सकृतदर्शनी प्रकरण नसुन सोयीचा समतोल प्रतिवादींच्या बाजुने आहे. तसेच तुर्तातुर्त ताकीद अर्ज नामंजुर केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे, त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज नामंजुर करणेत यावा.

**<u>मुद्दे क्र.१ ते ३ करीता -</u>**

१०. वादींचे विद्वान विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला आहे की, तहसिलदार, वाई यांनी मामलेदार कोर्ट ॲक्टमधील कुठल्याही कायदेशीर तरतुदीचा अवलंब न करता निर्णय दिलेला आहे. तसेच तोच निर्णय उपविभागीय अधिकारी, वाई यांनी कायम ठेवला आहे. तसेच सदर निर्णय देण्यापुर्वी तहसिलदार यांनी जो स्थळपाहणी पंचनामा केला आहे त्यावर कुठल्याही स्वतंत्र साक्षीदारांच्या सहया नाहीत. त्यामुळे सदरचा निर्णय बेकायदेशीर असुन त्याची अंमलबजावणी झाल्यास वादींचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, त्यांनी सदरचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

११. वादींच्या विद्वान विधिज्ञांनी त्यांची भिस्त मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या

**सुदाम वि. महाराष्ट्र राज्य, २०२१ सी जे (बॉम्बे) ९०८** या न्यायनिवाडयावर ठेवली आहे. सदर न्यायनिवाडयामध्ये पंचनामा व साक्षीदारांचे जबाब हे मंडल अधिकारी यांनी नोंदविले होते व त्यामध्ये मुद्दे व उलटतपास न घेता निर्णय दिला होता. परंतु, प्रस्तुत प्रकरणामध्ये मंडल अधिकारी यांनी पंचनामा केला व साक्षीदारांचे जबाब नोंदविले अशी वादींची केस नाही. तसेच वादींना साक्षीदार तपासायचे होते व तहसिलदार यांनी त्यांचे साक्षीदार न तपासता निर्णय दिला अशी देखील वादींची केस नाही. त्यामुळे, सदर न्यायनिवाडयाचा सन्मान राखुन तो या प्रकरणास लागु होत नाही असे मला वाटते.

१२. तसेच वादींच्या विद्वान विधिज्ञांनी त्यांची भिस्त मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या **मोहमंद खान रहिम खान वि. शंकर मारुती ढगे व इतर, २०१७ सी जे (बॉम्बे) ३०१** या न्यायनिवाडयावर ठेवली आहे. सदर न्यायनिवाडयामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने असे विषद केले आहे की, मामलेदार कायदयातील कलम ५ व २३ खालील आदेश अंतीम नाहीत. त्यामुळे दिवाणी न्यायालयास सदर आदेशाविरुद्ध दावा चालविणेचा अधिकार आहे. सदर न्यायनिवाडयास अधीन राहुन दिवाणी न्यायालयास प्रस्तुतचा दावा चालविणेचे अधिकारक्षेत्र आहे असे मला वाटते.

१३. तसेच वादींच्या विद्वान विधिज्ञांनी त्यांची भिस्त मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या **वल्लभभाई वस्ताभाई कुकाडीया वि. उपजिल्हाधिकारी गोताड, २०२२ सी जे (गुजरात) २११** या न्यायनिवाडयावर ठेवली आहे. सदर न्यायनिवाडयामध्ये मा. गुजरात उच्च न्यायालयाने असे विषद केले आहे की, मामलेदार यांनी मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ मधील सर्व कलमांचे पालन करणे बंधनकारक आहे. त्यांनी पालन न केल्यास त्यांचा आदेश रद्द ठरतो. सदर प्रकरणामध्ये उपजिल्हाधिकारी यांचा आदेश मा. उच्च न्यायालयात रीट पिटीशनद्वारे आव्हानीत करण्यात आला होता. प्रस्तुतचा दावा वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ९ अन्वये दाखल करुन त्यामध्ये सदर संहितेच्या आदेश ३९ नियम १ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरणात दिवाणी न्यायालय हे मामलेदार यांच्यासमोरील प्रकरण व इतर दाखल केलेला पुरावा पाहु शकते. त्यामुळे, सदर न्यायनिवाडयाचा सन्मान राखुन तो या प्रकरणास लागु होत नाही असे मला वाटते.

१४. प्रस्तुत अर्जामध्ये वादींनी सर्व प्रतिवादींविरुद्ध तुर्तातुर्त ताकीद मागितलेली आहे. परंतु, प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी क्रं.७, १९ व २४ यांचेविरुद्ध दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ९ नियम ५ अन्वये खारीज करण्यात आला आहे. सदरचा अर्ज मंजुर केल्यास त्यांना दाव्याचे समन्स अथवा अर्जाच्या नोटीसची बजावणी न होता आणि दावा खारीज झाला असताना त्यांच्याविरुद्ध आदेश पारीत केल्यासारखे होईल.

१५. वादींनी तहसिलदार, वाई यांच्या दि.१४.०९.२०२२ रोजीच्या आदेशाची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, हनुमानवाडी ते कोळीवस्ती पाणंद रस्त्याची प्रत्यक्ष स्थळपाहणी करताना रस्त्याचे सुरूवातीस १२ फुट रुंदी असुन गट नं.२८७ चे जमीन मालक सामनेवाला यांनी सदरचा रस्ता खोदुन रुंदी ४.५ फुट ते ३ फुटापर्यंत पाऊलवाट ठेवल्याचे दिसुन आले. तसेच स्थळपाहणीच्या वेळेस उपस्थीत अर्जदार व सामनेवाला यांनी सदरचा रस्ता ७५ वर्षापासुन चालु असल्याचे कबुल केले आहे आणि अर्जदार यांना पर्यायी रस्ता उपलब्ध असल्याचे दिसुन आले नाही असा निष्कर्ष नोंदविला. सामनेवाला यांनी रस्ता खोदुन अरुंद केला असल्याचे दिसुन आले आहे. त्यामुळे, सदर रस्ता पुर्ववत करुन देणे आवश्यक असल्याचे त्यांचे मत झाले आहे.

१६. वादींनी स्थळपाहणी पंचनाम्याची प्रत देखील अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता सदर पंचनाम्याचेवेळी वादी व प्रतिवादी उपस्थीत होते असे दिसुन येते. सदर रस्ता मागील ७५ वर्षापासुन अस्तीत्वात असल्याचे उपस्थीतांनी सांगितले. रस्त्याचे सुरूवातीस साकस पुलाच्या इथे रस्त्याची रुंदी १२ फुट आहे. पुढे गेल्यानंतर सदर रस्त्याची रुंदी ८ फुट दिसुन येते. सदर ८ फुट रुंदी चिंचेच्या झाडापर्यंत दिसुन येते. चिंचेच्या झाडापुढे प्रतिवादी यांच्या गटातुन रस्त्याची रुंदी ४.५ फुट दिसुन येते. सदर रस्त्याची रुंदी कमी झाल्याबाबत प्रतिवादी यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, त्यांच्या गटातील पुर्वीच्या रस्त्यास लागुन असलेले क्षेत्र पावसाने ढासळल्याने रुंदी कमी झालेली आहे. सदर रुंदी ही प्रतिवादी यांच्या गटाच्या बांधापर्यंत दिसुन येते. सदरचा रस्ता हा कोळीवस्ती ते

गाढवेवाडीकडे जात आहे. प्रतिवादी यांच्या गटाची हद्द संपल्यानंतर रस्त्याची रुंदी पुन्हा अंदाजे १० ते १२ फुट दिसुन येते. सदर पंचनाम्यावर तहसिलदार यांची समक्ष म्हणुन सही आहे आणि वादी व प्रतिवादींच्या सहया आहेत. तहसिलदार यांनी केलेल्या स्थळपाहणी पंचनाम्यावरुन गट नं.२८७ मधुन हनुमानवाडी ते कोळीवस्ती जाणारा रस्ता अस्तीत्वात असल्याचे दिसुन येते.

१७. याठिकाणी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे **श्रीकृष्ण शेषराव दाने वि. वसंत रामराव तायडे, २०१७ (७) (बॉम्बे) सी आर ६९४** हा न्यायनिवाडा नमुद करणे आवश्यक आहे असे मला वाटते. सदर न्यायनिवाडयामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने असे विषद केले आहे की, मामलेदार कोर्ट ॲक्टमधील कलम ५(२) नुसार दाखल केलेल्या प्रकरणामध्ये तहसिलदार यांनी पुर्वपार रस्ता अस्तीत्वात आहे किंवा नाही एवढेच पाहणे आवश्यक आहे. पर्यायी रस्ता उपलब्ध आहे का हे पाहणे आवश्यक नाही. प्रस्तुत प्रकरणामध्ये स्थळपाहणी पंचनाम्याद्वारे सदर रस्ता अस्तीत्वात आहे असे दिसुन येते. तसेच तो रस्ता अस्तीत्वात नाही हे दाखविण्याकरीता वादींनी कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. केवळ वादींच्या तोंडी कथनावर विसंबुन राहुन तहसिलदार यांनी रस्ता खुला करण्याचा दिलेला आदेश बेकायदेशीर आहे असे म्हणता येणार नाही. तसेच काही प्रतिवादींविरुद्ध दावा खारीज झाला असल्याने सदरचा अर्ज मंजुर करता येणार नाही असे मला वाटते. त्यामुळे, प्रथमदर्शनी प्रकरण वादींच्या बाजुने नाही या निष्कर्षास मी आलो आहे.

१८. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांना पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. परंतु, प्रतिवादींना पर्यायी रस्ता उपलब्ध आहे म्हणुन पुर्वपार चालु असलेला रस्ता बांध कोरुन वादींना बंद करता येणार नाही असे प्रथमदर्शनी दिसुन येते. सदरचा अर्ज नामंजुर केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी, तहसिलदार यांनी त्यांच्या निर्णयामध्ये प्रतिवादींनी पर्यायी रस्ता उपलब्ध नसल्याचे नमुद केलेले आहे. त्यामुळे, सदरचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल. तसेच सोईचा समतोल हा वादींच्या बाजुने नसुन तो प्रतिवादींच्या बाजुने आहे. त्यामुळे मी या निष्कर्षास आलो आहे की, सोईचा समतोल वादींच्या बाजुने नसुन तुर्तातुर्त ताकीद अर्ज

नामंजुर केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, मी मुद्दे क्रं.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करीता -</u>**

१९. सकृतदर्शनी प्रकरण वादींच्या बाजुने नाही. तसेच सोईचा समतोल हा वादींच्या बाजुने नसुन तुर्तातुर्त ताकीद अर्ज नामंजुर केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे मी या निष्कर्षास आलो आहे की, सदरचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. प्रकरण हे प्रारंभिक टप्प्यावर असल्याने खर्चाबाबत कोणताही आदेश पारीत करण्यात येत नाही. सबब, मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

**<u>आदेश</u>**

(१) अर्ज (नि.क्र.५) नामंजुर करण्यात येतो.

(२) खर्चाबाबत आदेश नाही.

ANKUSH ATMARAM PACHARNE
Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.12.04 17:38:04 +0530

स्थळ : वाई
दिनांक :०४.१२.२०२५

( ए. ए. पाचरणे )
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.